# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
कॅम्प - मानोरा
दि.०८.०९.२०२०

**आरोपी लोकसेवक व खाजगी व्यक्ती यांनी २०००/- रुपयेची लाचेची मागणी केल्याबाबत कार्यवाही...**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १) गणेश देविदास कुरकुरे, पोलीस हवालदार, ब.नं.६९, पो.स्टे.मानोरा, रा.शिक्षक कॉलणी कारंजा लाड जि.वाशिम<br>२) ज्ञानेश्वर श्रीराम जाधव, रा.कारपा ता.मानोरा, जि.वाशिम (खाजगी इसम) |
| लाच मागणी रक्कम | २०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार व त्यांचा मित्र व त्यांचा मामेभाउ यांचे त्यांचे गावात ईतर व्यक्ती सोबत झालेल्या किरकोळ भांडणाचे प्रकरण निपटविण्याकरीता |
| सापळा अधिकारी | ए.पी.इंगोले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदाराने तक्रार दिली की, तक्रारदार, त्यांचा मित्र व त्यांचा मामेभाउ यांचे गावात ईतर व्यक्ती सोबत झालेल्या किरकोळ भांडणावरून ईतर व्यक्ती यांनी तक्रारदार यांचे विरूध्द पोलीस स्टेशन मानोरा येथे तक्रार दिली असून सदर प्रकरण निपटविण्याकरीता बिट जमादार कुरकुरे यांनी त्यांना तडजोडीअंती २०००/-रूपये लाचेची मागणी केली. त्यांचे विरूध्द कार्यवाही करावी. अशी तक्रार दि.१०.०८.२०२० रोजी तक्रारदारांनी दिली.

सदर तक्रारीवरुन दि.१०.०८.२०२० रोजी पडताळणी केली असता गणेश कुरकुरे, पोलीस हवालदार यांनी तक्रारदाराकडून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच ज्ञानेश्वर जाधव (खाजगी इसम) यांनी जमादार कुरकुरे यांना लाच रक्कम देण्याबाबत तक्रारदार यांना प्रोत्साहीत केले. वरून त्यांचे विरूध्द कलम ७,१२ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारीत २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव देशमुख, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती तसेच मा.पोलीस उपअधिक्षक श्री.एस.व्ही.शेळके यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ए.पी.इंगोले व स्टाफ ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन ए.पी.इंगोले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
पो.नि. ए..पी.इंगोले- ८९९९९६१२६८

( ए.पी.इंगोले )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

कार्यालय पोलीस उपअधिक्षक ... वाशिम

Scanned with CamScanner